# भारती विद्यापीठ
# स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

## प्राथमिक परीक्षा

**एकूण गुण - ५०** **परीक्षेचा कालावधी - १५ मी.**

**किमान गुण - १८**

एकूण तास - ५०

**सैद्धांतिक :-** **एकूण गुण – १५**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. सैद्धांतिक विषयाचा अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी विचारण्यात येईल.

१) कथक नृत्याची ५ वाक्यांत माहिती

२) स्वतःची, गुरूंची व संस्थेची ५ वाक्यांत माहिती -

३) त्रितालची माहिती

४) व्याख्या : लय, विलंबित लय, मध्य लय, द्रुत लय, मात्रा, सम, टाळी, काल, खंड

**प्रात्यक्षिक :-** **एकूण गुण - ३५**

१) त्रितालच्या १६ मात्रा, आकड्यांमध्ये टाळी, काल दाखवून बराबर, दुगून, चौगुन मध्ये म्हणणे.

२) त्रितालचा ठेका टाळी, काल दाखवून बराबर, दुगून, चौगुन मध्ये म्हणणे.

३) त्रिताल मध्ये खालील रचना हातावर टाळी व कालासहित म्हणून दाखवणे :
साधे तोडे ६, चक्रदार तोडे २, तिहाई २.

## भारती विद्यापीठ

## स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

**प्रमाणपत्र परीक्षा – भाग १**

**एकूण गुण – ७५** **परीक्षेचा कालावधी - २० मी.**

**किमान गुण - २७**

एकूण तास - ६०

**सैद्धांतिक:-** **एकूण गुण – १५**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही. सैद्धांतिक विषयाचा अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी विचारण्यात येईल.

१) व्याख्या सांगा : लय, विलंबित लय, मध्य लय, द्रुत लय, मात्रा, सम, टाळी, काल, तिहाई, गतपलटा, गतनिकास, बाँट.

२) दादरा, केहरवा तालाची संपूर्ण माहिती.

३) काललिपीची महत्वाची चिन्हे

४) ५ ज्येष्ठ कथक गुरूंची नावे

५) अभिनयदर्पणनुसार खालील असंयुक्त मुद्रा दाखवून त्यांचे प्रत्येकी ३ उपयोग सांगणे : पताका, त्रिपताका, अर्धपताका, कर्तरीमुख, मयूरहस्त, अर्धचंद्र, अराल,शुकतुंड, मुष्टी, शिखर, कपित्थ, कटकामुख, सूची, चंद्रकला, पद्मकोष.

**प्रात्यक्षिक :-** **एकूण गुण – ६०**

अ) ताल त्रिताल :

१) थाट - २

२) साधा आमद - १

३) तोडे - ६

४) चक्रधार तोडे - २

५) परन - २

६) तिहाई - १

ब) गतनिकास - सीधी गत, मटकी गत, बाँसुरी गत.

क) ततकारची बराबर, दुगून, चौगुन, तिहाई सहित.

ड) त्रितालचा ठेका (बराबर, दुगून, चौगुन) आणि प्रस्तुतीतील सर्व रचना टाळी, कालासहित म्हणणे आवश्यक.

ई) त्रिताल मध्ये बाँट.

फ) केहरवा किंवा दादरा तालात एक अभिनय गीत (गीत पाठ असणे आवश्यक)

## भारती विद्यापीठ

## स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

**प्रमाणपत्र परीक्षा – भाग २**

**एकूण गुण – १२५**

एकूण तास - ६५

**सैद्धांतिक :-**

**एकूण गुण - ५०** **किमान गुण - १८** **परीक्षेचा कालावधी - २ तास**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१.कथक नृत्याचा इतिहास (थोडक्यात १० ते १५ वाक्यात)

२.व्याख्या लिहा:

आमद, तोडा, तुकडा, ततकार, परन, चक्रधार परन, चक्रधार तोडा, कवित्त,
अंग, प्रत्यंग, उपांग, गतभाव, हस्तमुद्रा, ताल.

३.लोकनृत्य म्हणजे काय ? ५ प्रादेशिक लोकनृत्य प्रकारांची नावे सांगा.

४. ५ शास्त्रीय नृत्यप्रकारांची नावे व त्यांची राज्ये.

५. कोणत्याही एका कथक गुरूंचे चरित्र १० वाक्यात लिहा.

६. कथक नृत्याला साथसंगत करणाऱ्या ५ तबला वादकांची नावे लिहा.

७. खालील असंयुक्त हस्तमुद्रा व त्यांचे उपयोग (फक्त नाव, प्रत्येकी ३ उपयोग)

सर्पशीर्ष, मृगशीर्ष, सिंहमुख, कांगुल, अलपद्म, चतुर, भ्रमर, हंसास्य, हंसपक्ष,
संदंश, मुकुल, ताम्रचूड, त्रिशूल, व्याघ्र, अर्धसूची, कटक, पल्ली.

**प्रात्यक्षिक :-**

**एकूण गुण - ७५** **किमान गुण - २७** **परीक्षेचा कालावधी - २० मी.**

(१) ताल त्रिताल :

| | |
|---|---|
| थाट - २ | परन - २ |
| परन आमद - १ | चक्रधार परन - १ |
| रंगमंच प्रणाम - १ | कवित्त - १ |
| तोडे - ४ | तिहाई - १ |
| चक्रधार तोडे - १ | चक्रधार तिहाई - १ |

(२) गतनिकास - सीधी गत, मटकी गत, बाँसुरी गत, मोरमुकुट, घुंगट

(३) गतभाव - (पनिहारी)गोपीचे पाणी भरणे, कृष्णाने घागर फोडणे, गोपीचे रागावणे, कृष्णाचे हसणे,

(४) गतनिकास व गतभाव मध्ये वापरल्या गेलेल्या सर्व हस्तमुद्रांची नावे

(५) त्रितालमध्ये आधी, बराबर, दुगून, चौगुन, आठगुन तिहाई सहित येणे आवश्यक

(६) त्रिताल मध्ये बाँट (आधीच्या वर्षापेक्षा वेगळा)

(७) झपतालची संपूर्ण माहिती, हातावर ठेका म्हणता येणे आवश्यक -
बराबर, दुगून, चौगुन, तिहाई सहित येणे आवश्यक.

(८) ताल झपताल:

| | | |
|---|---|---|
| थाट - १ | साधा आमद - १ | रंगमंच प्रणाम - १ |
| तोडा - १ | चक्रधार तोडा - १ | परन - १ |
| चक्रधार परन - १ | तिहाई - १ | |

सर्व बोल टाळी, काल देऊन म्हणता येणे आवश्यक.

# भारती विद्यापीठ
## स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

**उच्च प्रमाणपत्र परीक्षा – भाग १**

**एकूण गुण – २००**

एकूण तास - ७०

**सैद्धांतिक :-**

**एकूण गुण - ७५** **किमान गुण - २७** **परीक्षेचा कालावधी - ३ तास**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१. नृत्त, नृत्य आणि नाट्य या नर्तनाच्या महत्वाच्या घटकांची संपूर्ण माहिती.

२.लास्य व तांडव अंग म्हणजे काय ते सांगून, यांचे कथक मधील स्थान स्पष्ट करणे.

३. अभिनय दर्पणनुसार : ग्रीवाभेद (४ प्रकार), शिरोभेद (९ प्रकार) - विनियोगांसहीत.

४. पं. कालका महाराज, पं. बिंदादीन महाराज, पं. हरिहर प्रसाद आणि
पं. हनुमान प्रसाद यांचे संक्षिप्त चरित्र.

५.लोकनृत्य म्हणजे काय ते सांगून कोणत्याही २ लोकनृत्यांची सविस्तर
माहिती सांगणे.

६.लखनौ आणि जयपूर घराण्यांची वैशिष्ट्ये आणि प्रत्येकी ५ /५ ज्येष्ठ
नर्तकांची नावे.

७.खालील संयुक्त हस्तमुद्रांचे प्रत्येकी ३ /३ उपयोग (अभिनय दर्पणनुसार)
अंजली, कपोत, कर्कट, स्वस्तिक, डोला, पुष्पपुट, उत्संग, शिवलिंग,
कटकावर्धन, कर्तरी स्वस्तिक, शकट, शंख, चक्र, सम्पुट, पाश.

८.त्रिताल, झपताल आणि एकताल च्या सर्व रचना लिपिबद्ध करणे.

९. संत मीराबाईंचे चरित्र थोडक्यात लिहिणे.

**प्रात्यक्षिक :-**

**एकूण गुण - १२५** **किमान गुण - ४४** **परीक्षेचा कालावधी - २५ मी.**

(१) कोणतीही एक वंदना

(२) त्रिताल:

| | |
|---|---|
| थाट - ३ | परन - ३ (यातील १ तिश्र जाती) |
| साधा आमद - १ | चक्रधार परन - २ |
| परन आमद - १ | कवित्त - २ |
| तोडे - २ | चक्रधार तिहाई - २ |
| चक्रधार तोडे - ३ | |

(३)  त्रितालमध्ये आधी, बराबर, दुगून, तिगुन, चौगुन, आठगुन करणे व ताल देऊन म्हणणे

(४) त्रितालात बाँट किंवा चलन यापैकी कोणतेही  एक

(५) त्रितालात गतनिकास - बिंदी (दागिना), कलाई, मटकी (घागर) चे विविध प्रकार

(६) गतभाव - माखानचोरी

(७) झपताल:

| | | |
|---|---|---|
| थाट – २ | आमद - १ | तोडे - ३ |
| चक्रधार तोडे - २ | परन - २ | चक्रधार परन - २ |
| तिहाई – १ | चक्रधार तिहाई – १ | कवित्त - १ |

ततकार - बराबर, दुगून, चौगुन, तिहाईसह करणे.

(८) एकताल:

| | |
|---|---|
| थाट – २ | आमद - १ |
| तोडे – २ | चक्रधार तोडा - १ |
| परन – १ | चक्रधार  परन - १ |
| तिहाई – १ | ततकार - बराबर, दुगून, चौगुन, तिहाईसह करणे. |

(९) अभिनय:

एक भजन (रचनाकाराचे नाव, भजनाचे शब्द व त्यांचा अर्थ माहिती असणे आवश्यक).

प्रात्यक्षिकातील सर्व रचना प्रमाणपत्र  परीक्षा  -२  पेक्षा वेगळ्या असणे अपेक्षित. त्यांचा स्तर उच्च प्रमाणपत्र  परीक्षेसाठी  योग्य असावा.

## भारती विद्यापीठ
## स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

**उच्च प्रमाणपत्र परीक्षा – भाग २**

**एकूण गुण – २५०**

एकूण तास - ७०

**सैद्धांतिक :-**

**एकूण गुण - १००** **किमान गुण - ३५** **परीक्षेचा कालावधी - ३ तास**

या परीक्षेसाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१. कथक नृत्यातील मंदिर परंपरा व दरबार परंपरा यांची माहिती.

२. अ) बनारस घराण्याची माहिती

ब) लखनौ, जयपूर घराण्याची वंशपरंपरा.

३. अ) अभिनय दर्पणनुसार संयुक्त हस्तमुद्रांपैकी खालील मुद्रांचे उपयोग :

कीलक, मत्स्य, कूर्म, वराह, गरुड, नागबंध, खटवा, भेरुंड.

ब) अभिनय दर्पणनुसार ८ प्रकारच्या दृष्टीभेदांची विनियोगांसह माहिती.

४. त्रितालचा ठेका आधी १/२, पौनी ३/४ (पाऊण पट), कुआडी १ १/४ (सव्वापट), आडी १ १/२ (दीडपट), बिआडी १ ३/४ (पाऊणे दोनपट) या लयीत लिपिबद्ध करा.

५. अभिनय म्हणजे काय ते सांगून आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्विक या चारही प्रकारांची सविस्तर माहिती लिहा.

६. जीवनचरित्र लिहा :

(१) पं. अच्छन महाराज, (२) पं. शंभू महाराज, (३) पं. लच्छू महाराज, (४) पं. सुखदेव महाराज.

७. प्रात्यक्षिकातील सर्व रचना लिपिबद्ध करणे.

८. तालाच्या दशप्राणांची फक्त नावे. त्यातील जाती व यति विषयी सोदाहरण स्पष्टीकरण करा.

९. श्रीकृष्णचरित्रातील कोणत्याही एका कथेचे सविस्तर वर्णन लिहा.

१०. व्याख्या सांगा : फर्माईशी चक्रदार परन, परमेलू, गणेश परन, तिश्रजाती व चतुश्रजाती परन.

११. भरतनाटयम , मणिपुरी, कथकली, ओडिसी, या शैलींची खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती :

(१) उगम (२) विकास, (३) प्रस्तुतीचा क्रम, (४) साथसंगत, (५) पोषाख, (६) प्रसिध्द नर्तक

**प्रात्यक्षिक :-**

**एकूण गुण - १५०** **किमान गुण - ५३** **परीक्षेचा कालावधी - २५ मी.**

(१) श्रीकृष्ण वंदना किंवा शिववंदना

(२) ताल त्रिताल:

उठान
परमेलू - १
थाट
गणेश परन - १
आमद
फर्माईशी परन - १
बेदम तिहाई - १
ततकार - लडी
नटवरी तोडा - १ (ता, थै, तत् या शब्दांची रचना)

(३) एकताल:

थाट - २
परन - २
परन आमद - १
चक्रधार परन - २
तोडे - ४
तिहाई - २
चक्रधार तोडे - २
कवित्त - १
ततकार - बराबर, दुगून, तिगुन, चौगुन, तिहाईसह.

(४) रुपक:

थाट - १
परन - २
साधा आमद - १
चक्रधार परन - २
तोडे - ४
कवित्त - १
चक्रधार तोडे - २
तिहाई - २
ततकार - बराबर, दुगून, चौगुन, तिहाईसह.

(५) झपतालमध्ये बराबर, दुगून, तिगुन, चौगुन, तिहाईसह

(६) गतनिकास - (१) रुखसार, (२) छेडछाड, (३) आँचल

(७) गतभाव - कालियादमन

(८) 'होरी' काव्यावर अभिनय

(रचनाकाराचे नाव, काव्याचे शब्द व त्यांचा अर्थ माहिती असणे आवश्यक)

सर्व रचना व क्रमलयी ताल देऊन म्हणता येणे आवश्यक.

## भारती विद्यापीठ
## स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

**पदविका परीक्षा – भाग १**

**एकूण गुण – ४००**

एकूण तास - ७०

**सैद्धांतिक :-**

**एकूण गुण - १५० किमान गुण - ३० / प्रश्नपत्र परीक्षेचा कालावधी - ३ तास / प्रश्नपत्र**

या परीक्षेत सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र - १</u>** **एकूण गुण – ७५**

१.उच्च प्रमाणपत्र - २ पर्यंतच्या सर्व व्याख्यांचा अभ्यास.

२.ब्रह्मदेवानी नाट्यवेद का व कसा निर्माण केला? (नाट्योत्पत्तीची कथा)
भरतमुनींनी सादर केलेल्या नाट्यप्रयोगांचे वर्णन करा.

३.अभिनय दर्पणनुसार नायकांचे चार प्रकार - ( धीरोद्धत, धीरललित,
धीरप्रशांत, धीरोदात्त) सोदाहरण स्पष्ट करा.

४.नवरस म्हणजे काय ते सांगून प्रत्येक रसाविषयी सविस्तर लिहा.

५अष्टनायिकांपैकी अभिसारिका, खंडिता, विप्रलब्धा आणि प्रोषितपतिका या
चार नायिकांची सविस्तर माहिती.

६.दशावतारांची माहिती सांगून त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या हस्तमुद्रा लिहा.
तसेच कोणत्याही एका अवताराची सविस्तर कथा लिहा.

७.कथक नृत्याच्या अभ्यासाने "शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास
होतो" हे स्पष्ट करा.

८.-- प्रात्यक्षिकातील आत्तापर्यंतच्या अभ्यासक्रमातील त्रिताल, झपताल,
एकताल, रूपक, धमार, रास आणि गजझंपा या तालांमधील रचना लिपीबद्ध
करणे.

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण - ७५**

१.प्रात्यक्षिकातील आत्तापर्यंतच्या अभ्यासक्रमातील त्रिताल, झपताल,
एकताल, रूपक, धमार, रास आणि गजझंपा या तालांमधील रचना लिपीबद्ध
करणे.

२.कथक नृत्यात सादर होणाऱ्या खालील रचनांची माहिती
(१) होरी, (२) चतरंग, (३) ठुमरी, (४) चैती, (५) कजरी, (६) धृपद,
(७) अष्टपदी, (८) त्रिवट, (९) तराणा, (१०) सरगम इ

३. (अ) व्याख्या लिहा - (१) त्रिपल्ली, (२) कमाली चक्रधार परन, (३) त्रिभंग,
(४) कसक - मसक, (५) भ्रमरी, (६) गिनती
(ब) संतकवी सूरदास यांचे जीवनचरित्र.

४.स्थायीभाव, भाव, विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव यांचे सविस्तर वर्णन
(रससिद्धांताची विस्तृ तमाहिती)

५.कथक नृ त्यक्षेत्रात नवाब वाजिद अली शाह आणि रायगड चे महाराज
चक्रधर सिंह यांचे योगदान.

६.पं.नारायण प्रसाद, पं. जयलाल, पं. गोपीकृष्ण आणि पं. बिरजू महाराज
यांचे चरित्र.

७.निबंध - (१) गुरुशिष्य परंपरेचे महत्व,
(२) शिष्याचे गुण आणि गुरूबद्दल कर्तव्य,
(३) ठुमरी आणि कथक नृ त्य

**प्रात्यक्षिक :-**

**एकूण गुण - २५०** **किमान गुण - १००** **परीक्षेचा कालावधी - ३० मी.**

**रंगमंच सादरीकरण –** **एकूण गुण – ७५**

वंदना, ताल आणि अभिनय यासह २० ते ३० मिनिटे.

**प्रात्यक्षिक परीक्षा-** **एकूण गुण – १७५**

(१) सरस्वती वंदना / गुरुवंदना / विष्णूवंदना - यांपैकी एक

(२) त्रिताल, झपताल व एकताल यामध्ये विशेष तयारी
(वैशिष्ठ्यपूर्ण रचना - प्रत्येकी २-३)

(३) गजझंपा, रास आणि धमार या तालांमध्ये खालील रचना:

| | |
|---|---|
| थाट - २ | चक्रधार परन - १ |
| आमद - १ | कवित्त - १ |
| तोडे - २ | तिहाई - १ |
| चक्रधार तोडे - २ | गिनती - १ |
| परन - १ | |

ततकार द्वारे वरील तिन्ही तालांमध्ये बराबर, दुगून, चौगुन करणे.

(४) गतनिकास - (१) आँचल, (२) सीधी गत

(५) गतभाव - द्रौपदी चीरहरण

(६) एक तराणा किंवा त्रिवट

(७) अभिसारिका, खंडिता, विप्रलब्धा आणि प्रोषितपतिका या नायिका पद / ठुमरी /
गतभाव यांद्वारे सादर करणे.

(८) संत कवी सूरदास यांचे १ भजन अभिनयाद्वारे सादर करणे

(९) कोणतीही एक ठुमरी सादर करणे

(१०) सर्व तालांमधील रचनांची टाळी, काल दाखवून पढंत करणे. प्रत्येक तालातील एक
रचना फक्त ठेक्यावर करणे.

(११) सर्व सांगीतिक रचनांच्या राग व तालांची नावे सांगणे

**भारती विद्यापीठ**
**स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)**

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

**पदविका परीक्षा – भाग २**

**एकूण गुण – ४००**

एकूण तास - ७०

**सैद्धांतिक :-**

**एकूण गुण - १५० किमान गुण - ३० / प्रश्नपत्र परीक्षेचा कालावधी - ३ तास / प्रश्नपत्र**

या परीक्षेत सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र - १</u>** **एकूण गुण – ७५**

१.नृत्याचा उगम आणि त्याचा शास्त्रीय स्वरूपापर्यंतचा प्रवास.

२.रामायण, महाभारत, पुराणे यामध्ये नृत्याचे संदर्भ.

३.नायिका भेदांचे सविस्तर वर्णन -

अ) आयु भेदानुसार नायिका : मुग्धा, मध्या, प्रौढा

ब) धर्म भेदानुसार नायिका : स्वकीया, परकीया, सामान्या

क) प्रकृतिनुसार नायिका : उत्तमा, मध्यमा, अधमा

ड) जातिभेदानुसार नायिका : पद्मिनी, चित्रणी, शंखिणी, हस्तिनी

इ) परिस्थितीनुसार नायिका : अष्टनायिका

४.कुचीपुडी, मोहिनीअट्टम, छाऊ, सत्रिय या शास्त्रीय नृत्याशैलींचे खालील मुद्द्यांनुसार विवेचन :

(१) उगम, (२) विकास, (३) सर्वसाधारण प्रस्तुतीक्रम, (४) साथसंगतीची वादये,

(५) पेहराव, (६) प्रसिद्ध ज्येष्ठ नर्तक

५.लय आणि ताल यांचा उगम आणि त्यांचे कथक नृत्यातील महत्व.

६.नाट्यशास्त्र आणि अभिनयदर्पण यांमधील संयुक्त व असंयुक्त हस्तमुद्रांमधील साम्य व फरक.

७.पंचमसवारी - १५ मात्रा, शिखर - १७ मात्रा, किंवा मत्त - ९/१८ मात्रा यात साधा आमद, परन आमद, तोडा, चक्रधार तोडा, परन, चक्रधार परन, तिहाई वगैरे लिपिबद्ध करणे.

८."पं. उदयशंकर निर्मित आधुनिक काव्य" याविषयी सविस्तर माहिती.

९.एकल नृत्यप्रस्तुतीसाठी रंगमंच व्यवस्था, ध्वनी संयोजन, प्रकाशयोजना आणि नेपथ्य यांचे महत्व

१०.प्राथमिक परीक्षेपासून पासुन आत्तापर्यंतच्या सर्व व्याख्या अनिवार्य.

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण – ७५**

१.कथक नृत्याचा गायन, वादन, साहित्य, चित्रकला आणि शिल्पकला या

ललित कलांशी असलेल्या संबंधाचे सविस्तर वर्णन करा.

२.भरतनाट्यशास्त्रानुसार खालील संकल्पनांची माहिती :

(१) धर्मी - लोकधर्मी, नाट्यधर्मी

(२) वृत्ती- भारती, सात्वती, कैशिकी, आरभट्टी

(३) अभिनय - शारीर, मुखज

३.तिहाईची गरज का निर्माण झाली असावी? ते स्पष्ट करून, खालील तिहाई प्रकारांचे सोदाहरण स्पष्टीकरण दया.

(१) सीधी तिहाई, (२) चक्रधार तिहाई, (३) गिनती तिहाई, (४) बेदम तिहाई

४.पं. कुंदनलाल गंगाणी, पं. दुर्गालाल, पं. सितारादेवी आणि पं. रोहिणी भाटे यांचे चरित्र.

५.तालाच्या दशप्राणांविषयी सविस्तर माहिती लिहा.

६."कथक नृत्यात लोकधर्मी व नाट्यधर्मी या दोन्ही परंपरांचा मेळ साधला जातो" या विधानाबाबत आपले मत स्पष्ट करा.

७.पाठ्यक्रमात झालेल्या सर्व तालांमधील रचना लिपीबद्ध करणे.

८."शास्त्रीय नृत्यशैलीही इतर नृत्यप्रकारांचा पाया होऊ शकते" हे विधान स्पष्ट करा.

**प्रात्यक्षिक :-**

**एकूण गुण - २५०** **किमान गुण - १००** **परीक्षेचा कालावधी - ३० मी.**

**रंगमंच सादरीकरण -** **एकूण गुण –७५**

वंदना, ताल आणि अभिनय यासह २० ते ३० मिनिटांचे सादरीकरण.

**प्रात्यक्षिक परीक्षा-** **एकूण गुण – १७५**

(१) कोणतीही एक वंदना

(२) शिखर (१७ मात्रा), मत्त (१८ मात्रा) आणि पंचमसवारी (१५ मात्रा) यामधे खालील रचना :

| | |
|---|---|
| थाट | परन - २ |
| आमद | चक्रधार परन - २ |
| तोडे - २ | कवित्त - १ |
| चक्रधार तोडे - २ | तिहाई - २ |

ततकार - ठेक्याची बराबर, दुगून, चौगुन.

(३) ततकारमध्ये बॉंट, लड़ी, चलन, रेला, कायदा यापैकी कोणतेही दोन कोणत्याही तालात.

(४) त्रिताल, झपताल, एकताल, रुपक, धमार यामध्ये प्रत्येकी एक तोडा / परन फक्त ठेक्यावर सादर करणे.

(५) गतनिकास - वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरण

(६) गतभाव - (१) नवरसांपैकी एका रसावर,

(२) दशावतारातील एका अवतारावर आधारित

(७) फक्त चेहऱ्याद्वारे नवरस दाखविणे

(८) कलहांतरिता, स्वाधीनपतिका, विरहोत्कंठिता, वासकसज्जा या नायिका पद/ ठुमरी/ गतभाव याद्वारे सादर करणे.

(९) सरगम/ चतरंग

(१०) काव्याच्या एकाच ओळीवर संचारी भाव दाखवणे

(११) (अ) त्रितालच्या लेहऱ्याचे स्वर गाऊन किंवा हार्मोनियमवर वाजवून दाखवणे

(ब) त्रितालमध्ये भुवया किंवा मान यांची लयबद्ध हालचाल.

(१२) परीक्षकांनी दिलेल्या शब्दसमूहाचा वापर करून त्रिताल, झपताल, एकताल, रूपक या तालांत तिहाई बनवणे.

(१३) सर्व तालांमधील रचनांची ताल धरून पढंत आवश्यक

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

**उच्च पदविका परीक्षा – भाग १**

**एकूण गुण – ५००**

एकूण तास - ८०

**सैद्धांतिक –**

**एकूण गुण - २०० किमान गुण - ४० / प्रश्नपत्र परीक्षेचा कालावधी - ३ तास / प्रश्नपत्र**

या परीक्षेत सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र - १</u>** **एकूण गुण – १००**

१.पाठयक्रमात असलेल्या सर्व तालांमधील रचना लिपीबद्ध करणे.
(रास- १३ मात्रा, गजझंपा- १५ मात्रा, बसंत- ९ मात्रा, (Rudr)- ११ मात्रा)

२.पाच जाती कोणत्या ते सविस्तर सांगून पाच जाती ५ वेगवेगळ्या तालात लिपीबद्ध करणे. (एक जाती - एकाच तालात)

३.झपतालचा ठेका आधी (१/२), पाऊण (३/४), कुआड (१ १/४), आड (१ १/२), बिआड (१ ३/४) या लयीत लिपीबद्ध करणे.

४.कथक नृत्याची परंपरा आणि सध्या त्याला मिळालेले नवनवीन पैलू यांचे सविस्तर विवेचन करा.

५.लोकनृत्यातील आदिवासी नृत्य, ग्रामीण नृत्य, शास्त्रीय नृत्य या प्रत्येकाचे स्पष्टीकरण लिहा.

६.नौटंकी, तमाशा, रासमंडल या प्रकारांची माहिती लिहा.

७.कथक नृत्य आणि त्याचे साहित्य याचे सविस्तर विवेचन करा.

८.पं. तिरथराम आझाद, डॉ. पुरु दधिच, पं. दमयंती जोशी, पं. माया राव यांचे जीवनचरित्र.

९.कथक नृत्यात साथसंगतीचे महत्व, त्याची आवश्यकता, संगत करणाऱ्या कलाकारांची मनोभूमिका यावर तुमचे मत लिहा.

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण – १००**

१.वैदिक आणि पुराणकाळातील साहित्यातील नृत्याचे संदर्भ स्पष्ट करा.

२.खालील नाट्यशास्त्रीय संकल्पनांची माहिती :

अ) वाद्यांचे प्रकार - तत् , सुषिर, अवनद्ध, घन

ब) रंगमंचाचे प्रकार - त्र्यस्त्र, चतुरस्त्र, वृत्त.

क) करण, अंगहार, चारी, गती, मंडल, स्थानक

३."कथक नृत्याचा आदर्श वस्तूक्रम" आपले मत स्पष्ट करा. (कार्यक्रम एक तासाचा आहे असे गृहीत धरा)

४.आपण पाहिलेल्या कोणत्याही एका कथक नृत्यप्रस्तुतीची समीक्षा लिहा.

५निबंध लिहा - कथक नृत्यात श्रीकृष्ण चरित्राचे महत्व.

६.कथक नृत्यासाठी रियाजाचे महत्व स्पष्ट करा.

७.नवरस ही संकल्पना स्पष्ट करून कोणत्याही एका रसाचे सविस्तर

कथानक लिहा.

८.अष्टनायिकांच्या प्रस्तुतीकरणामध्ये मुग्धा, मध्या आणि प्रौढा(प्रगल्भ) या अवस्थांचा विचार कशाप्रकारे आवश्यक आहे ते सोदाहरण स्पष्ट करा

९.सर्व तालांमधील रचना लिपीबद्ध करणे.

**प्रात्यक्षिक :-**

**एकूण गुण - ३००** **किमान गुण - १२०** **परीक्षेचा कालावधी - ४० मी.**

**रंगमंच सादरीकरण –** **एकूण गुण - १००**

कथकची समग्र प्रस्तुती २५ ते ३५ मिनिटे.

**प्रात्यक्षिक परीक्षा-** **एकूण गुण – २००**

१. कोणतीही एक वंदना/ स्तुती. (तालबद्ध असणे आवश्यक)

२. त्रिताल व झपताल मध्ये उच्च पदविका दर्जाची प्रस्तुती (समग्र).

३. रुद्रताल (११ मात्रा) व बसंत ताल (९ मात्रा) या तालांमध्ये खालील रचना :

| | |
|---|---|
| थाट | परन - २ |
| आमद -१ | चक्रधार परन - २ |
| तोडे - २ | कवित्त - १ |
| चक्रधार तोडे - २ | तिहाई - २ |

ततकार- ठेक्याची बराबर, दुगून, चौगुन.

४. रास, गजझंपा, शिखर, पंचमसवारी, मत्त यात प्रत्येकी एक वैशिष्ठ्यपूर्ण रचना. उदा. फर्माईशी परन, दर्जेदार परन, जातीपरन इ.

५. परीक्षकांनी दिलेल्या शब्दसमूहावर नवीन रचना/ तिहाई बांधणे.

६. ततकार फक्त ठेक्यावर सादर करणे. (चलन, रेला, कायदा वगैरे)

७. सर्व तालांतील रचना फक्त ठेक्यावर सादर करणे.

८. एक अष्टपदी किंवा धृपद (यापैकी एक).

९. विभिन्न तालात जातींवर आधारित रचना प्रस्तुत करणे.

१०. चैती, दादरा, झूला, सावन यापैकी एक रचना.

११. गतभाव - कांचनमृग किंवा श्रीकृष्ण तुला.

१२. सर्व रचनांची दमदार पढंत आवश्यक.

१३. एखादी आधुनिक कथा किंवा घटना किंवा परीक्षकांनी दिलेले कथानक गतभावाद्वारे सादर करणे.

## भारती विद्यापीठ

## स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे (भारत)

नृत्य (कथक) अभ्यासक्रम

**उच्च पदविका परीक्षा - भाग २**

**एकूण गुण – ५००**

एकूण तास - ८०

**सैद्धांतिक –**

**एकूण गुण - २००   किमान गुण - ४० / प्रश्नपत्र   परीक्षेचा कालावधी - ३ तास / प्रश्नपत्र**

या परीक्षेत सैद्धांतिक विषयासाठी दोन लेखी प्रश्नपत्र असतील.

**<u>प्रश्नपत्र - १</u>** **एकूण गुण – १००**

१.कथक नृत्यातील मंदिर, दरबार आणि रंगमंचीय परंपरेचे सविस्तर विवेचन करा.

२.नाट्यशास्त्रातील नृत्याध्यायांची थोडक्यात माहिती लिहा.

३.नाट्यशास्त्रानुसार रससिद्धांत स्पष्ट करा.

४.कथक नृत्याची लखनौ, जयपूर व बनारस घराण्यातील वैशिष्ठ्ये.

५.कथक नृत्याच्या संरचनेमध्ये होत असणाऱ्या नवीन प्रयोगांविषयी सविस्तर माहिती लिहा.

६.नृत्यसंरचनेची मूलभूत तत्त्वे सोदाहरण स्पष्ट करा.

७.संत तुलसीदासांचे चरित्र सांगून त्यांच्या एखाद्या काव्यप्रकाराचे कथक नृत्याच्या अनुषंगाने विवेचन करा.

८.गायन, वादन आणि नर्तन परस्परावलंबित्व स्पष्ट करा. (तौर्यत्रिक)

९.पाठ्यक्रमातील सर्व तालांमध्ये फर्माईशी परन, कमाली चक्रधार परन, कवित्त व तिश्रजाती आणि मिश्रजाती तिहाईमध्ये लिपीबद्ध करा.

**<u>प्रश्नपत्र - २</u>** **एकूण गुण – १००**

१.आत्तापर्यंतच्या पाठ्यक्रमातील सर्व व्याख्या सोदाहरण विवेचनासह स्पष्ट करणे.

२.स्पष्ट करा :

अ) मुघल काळात झालेला कथकचा विकास

ब) मुघल काळात झालेले कथकचे अधःपतन

३.पं. भातखंडे व पं. पलुस्कर यांच्याताललेखन पद्धतीची तुलना करा. एकच रचना दोन्ही पद्धतीनुसार लिहा.

४.सध्याच्या काळात कथक नृत्याला परंपरेचे बंधन असावे का? आपले मत स्पष्ट करा.

५.अभिनयदर्पण मधील पात्रलक्षण आणि नर्तकीलक्षण संस्कृत श्लोकासह

लिहून त्याचे विवेचन करा.

६.कथकमधील प्राचीन संज्ञांची माहिती

| | |
|---|---|
| १. घुमरिया, | ६. संच, |
| २. लोम-विलोम, | ७. जमनका, |
| ३. धुरन-मुरन, | ८. पोहोपाजुरी, |
| ४. लाग डांट, | ९. उरमई, |
| ५. उरप-तिरप-सुलप, | १०. उघटत. |

७.अभिनयदर्पणनुसार 'देव हस्त' वर्णन करा.

८.कथक नृत्यात घुंगरुंचे महत्व विशद करा.

९.कथक नृत्यात 'पढंत' ला कसे महत्व आहे?

१०.सर्व तालांमधील रचना लिपीबद्ध करणे.

**प्रात्यक्षिक :-**

**एकूण गुण - ३००** **किमान गुण - १२०** **परीक्षेचा कालावधी - ४० मी.**

**रंगमंच सादरीकरण -** **एकूण गुण – १००**

कथकचा समग्र वस्तुक्रम २५ ते ३५ मिनिटे

**प्रात्यक्षिक परीक्षा -** **एकूण गुण – २००**

१. गणेशस्तुति, दुर्गा स्तुति, राम स्तुति.

२. चौताल व धमारमध्ये पखवाजाच्या वैशिष्ठ्यपूर्ण रचना किमान प्रत्येकी ५/५.

३. धृपद किंवा लमछड कवित्त

४. गतभाव - रामायण, महाभारत किंवा भागवतातील एखादी प्रभावी कथा

५. पाठ्यक्रमातील रास, गजझंपा/ पंचमसवारी, शिखर, मत्त, बसंत/ लक्ष्मी या तालातील वैशिष्ठ्यपूर्ण रचना व कोणत्याही एका तालात ततकारमध्ये बराबर, दुगुन, तिगुन, चौगुन दाखविणे.

६. पं. बिंदादीन महाराजांची एक ठुमरी.

७. अष्टनायिकांचा विशेष अभ्यास.

८. कोणत्याही ५ रचना वेगवेगळ्या तालांत ठेक्यावर करणे आवश्यक.

९. ततकारवर प्रभुत्व. फक्त ठेक्यावर रेला, कायदा, चलन वगैरे सादर करणे.

१०. त्रिताल, झपताल, रूपक या तालांचे ठेके तबल्यावर वाजविणे आवश्यक व हार्मोनिअमवर लेहरा वाजविणे आवश्यक.

११. दमदार पढंत आवश्यक.